किरकोळ फौजदारी खटला क्र.१६/२०२३
निलम नाकाडे/प्रमोद नाकाडे
नि.क्र.२९

**अर्जदार निलम प्रमोद नाकाडे हिचा शपथेवर जादाचा सरतपास अर्जदाराचे विधीज्ञ श्रीमती. निलम बियाला यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१. मी प्रस्तुतकामी माझे लग्नाचे मुळ प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व गैरअर्जदार क्र. १ ची सही आहे. ती मी ओळखते. त्यावर गजानन महाराज संस्थान, वरूड यांचा शिक्का आहे. त्याला **नि.क्र. ३२** देण्यात येते. मला आता ग्राम पंचायत वडेगाव उमरी यांनी दिलेले विवाह नोंदणीचे मुळ प्रमाणपत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर सचिव ग्रामपंचायत वडेगाव उमरी यांची सही आहे. त्याला **नि.क्र. ३३** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी माझा मुलगा कोर्णाक प्रमोद नाकाडे याचे मुळ बोनाफाईड प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यावर शाळेच्या मुख्याध्यापकांची सही आहे. त्याला **नि.क्र. ३४** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी गैरअर्जदार क्र. १ ची शेती गट क्र. ४१३/१/ब च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत पत्र दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर ग्रामअधिका–यांची सही आहे. त्याला **नि.क्र. ३५** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी गट क्र. ४१३/१/ब चा ८–अ उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर तलाठीची सही आहे. त्याला **नि.क्र. ३६** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी गैरअर्जदार क्र. १ ने माझ्या नावावर घेतलेले गोल्ड लोनचे झेरॉक्स कागदपत्र दाखल केलेले आहे. त्याला **आर्टीकल–ए** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी युनीयन बँक ऑफ इंडिया, शाख नरखेड येथील माझ्या बँक खात्याच्या उता–याची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर बँकेच्या संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. त्याला **नि.क्र. ३७** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी गैरअर्जदार क्र. १ विरूध्द पोलीस स्टेशनला दिलेल्या अदखल पात्र तक्रारीची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.क्र. ३८** देण्यात येते. त्यावर माझी सही आहे. मी प्रस्तुतकामी माझे मख्ता व दायीत्वाचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.क्र. ३९** देण्यात येते.

**मध्यंतराची वेळ झाल्याने जादाचा सरतपास तहकूब.**

**जादाचा सरतपास पुन्हा शपथेवर सुरू.**

२. मी प्रस्तुतकामी माझे युनियन बँक ऑफ इंडिया शाखा नरखेड येथील बँकेतील खाताच्या उता–याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर

खरा व बरोबर आहे. त्यावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. त्याला **नि.क्र. ४०** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी युनियन बॅंक ऑफ इंडिया शाखा नरखेड येथे असलेल्या माझ्या खाताच्या पासबूकची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.क्र. ४१** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी माझ्या ब्युटी पार्लरचे मुळ फोटो दाखल केलेले आहेत. त्यांना **आर्टीकल बी व सी** देण्यात येते.  मी प्रस्तुतकामी माझ्या घर मालकांना ऑनलाईन घर भाडे भरल्याचे मोबाईलवरची पावती दाखल केलेली आहे. त्यांना **आर्टीकल डी** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी नि.क्र. ९ सोबत गैरअर्जदार क्र. १ व एका स्त्रीमधील मोबाईल क्र. ९५७९६४२०६५ वरील संभाषणाचा पेनड्राईव्ह दाखल केलेला आहे. त्याला **आर्टीकल ई** देण्यात येते.

**अर्जदाराच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून जादाचा सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**समक्ष**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक – १९.०३..२०२५**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव–  टी. एन. कांबळे (श्रेणी–३)**